I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 410-412
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# बचतगटाद्वारे महिलांचे सक्षमीकरण

सुचिता सुरेशराव धाबेकर

डॉ.खत्री महाविद्यालय तुकूम चंद्रपूर

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 01.04.2022

**संदर्भ :**

प्रस्तुत विषयाच्या माध्यमातून "बचतगटाव्दारे महिलांचे सक्षमीकरण" यातून महिलांच्या आत्मविश्वासात वाढ, महिलांना हक्काची जाणीव निर्माण करून त्यांना आत्मनिर्भर बनविण्यास हा विषय महत्तवाचा ठरतो. महिलांसाठी अनेक क्षेत्र खुणावत आहे. महिला सक्षमीकरणासाठी शासनाने अनेक योजना आखल्या आहेत. महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य व केन्द्रशासन नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वेगवेगळ्या मार्गांनी त्यांना मदत करत असते. महिला स्वावलंबी व स्वंयपूर्ण व्हाव्यात, त्यांचा विकास व्हावा, त्या जोमाने विकासकामात सहभागी व्हाव्या याकरीता शासन अनेक योजना राबवीत आहे. त्यातील "महिला बचत गट" ही एक महत्तवपूर्ण योजना आहे. या माध्यमातून जिद्द, मेहनत, धाडस या बळावर उद्योग व्यवसायातून महिलांना यशस्वीपणे समृद्धी खेचून आणता येते. महिलांच्या सक्षमीकरणाकरीता आजच्या आधुनिक काळात प्रस्तुत विषयाचे अध्ययन महत्त्वपूर्ण ठरते.

**बिजशब्द** — स्त्रीघटक, बचत गट, आर्थिक सक्षमीकरण, सामजिक सक्षमीकरण, राजकीय दृष्ट्य सक्षमीकरण.

**प्रस्तावना:**

भारताला स्वातंर्त्य मिळून ७५ वर्षे पुर्ण होत आहेत. तथापि स्वातंत्र्याचे फायदे उपभोगण्यात महिलांचा एक मोठा घटक आजही वंचित राहिला आहे. भारताच्या आर्थिक व सामाजिक व्यवस्थेत आजही महिलांना संधी वंचित, अर्थवंचित, सत्तावंचित व प्रतिष्ठांवंचित राहिल्या आहेत. स्वातंर्त्योत्तर काळात महिलांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले. परंतु त्याला अपेक्षेप्रमाणे यश मिळू शकले नाही. समाजात महिला हा घटक् नेहमी दुर्लक्षीत राहीला. त्यांच्या कष्टांची, गुणांची कदर केली गेली नाही स्त्रीचे संपुर्ण आयुष्य आपल्या कुटुंबासाठी खर्च होते. तरी स्त्रीघटकांचा मान कोणी ठेवत नाही. याचे मुख्य कारण स्त्रीची आर्थिकदृष्ट्य दुर्बलता ही आहे.

प्रत्येक राष्ट्र आपल्या देशातील स्त्री—पुरुष या दोघांच्या विकासाच्या माध्यमातून देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणू शकतात. त्याकरिता पुरुषबारोबरच स्त्रीयांचा विकास घडवुन आणणे आजच्या काळात अत्यंत गरजेचे आहे स्त्री विकासासाठी स्त्री सक्षमीकरण आवश्यक असते.

सक्षमीकरणसाठी २१ व्या शतकात स्त्रीयांना लढा देणे गरजेचे ठरते. शबरीमाला देवस्थानाबाबत आलेला निर्णय हे उदाहरण किंवा शिखर शिंगणापूरचा दिलेला लढा ही फार जुनी उदाहरणे नाहीत. भारतातच नव्हे तर पाश्चात्य देशातही महिलांना आपल्या अधिकारासाठी लढा द्यावा लागला. इंग्लंडमधील महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता त्यकरीता २० व्या शतकाच्या सुरुवातीला त्यांना लढा द्यावा लागला त्यातून १९१५—२० च्या दरम्यान त्यांना तो अधिकार प्राप्त झाला.

महिलांना पुरुषाच्या बरोबरीने समान कामासाठी कमी वेतन दिले जात होते. त्याविरुद्ध झगडुन समान वेतन अधिकार कायदे विविध देशात झाले. सामाजिक, राजकीय, औद्योगिक, वैद्यकीय या सर्वच क्षेत्रात आज स्त्रियांनी स्वत:च्या कर्तुत्वाने सर्वक्षेत्रे काबीज केलेली आहे. आज चूल आणि मुल या कार्यक्षेत्रातून बाहेर पडून अर्थाजन करित असल्यामुळे तीच्यात नवीन आत्मविश्वास निर्माण झाला आहे. यातूनच राष्ट्राच्या उत्पन्नात भर पडून राष्ट्रनिर्मितीस महत्वाचा हातभार लागला आहे.

राष्ट्र उभारणीतील महिलांची भूमिका लक्षात घेवून सरकारने २००१ हे वर्ष महिला सक्षमीकरणाचे वर्ष म्हणून घोषित केले.

**महिल सक्षमीकरणाचा अर्थ :—**

महिला सक्षमीरकण ही एक व्यापक संकल्पना आहे.

''स्त्रीला सामाजिक, आर्थिक, राजकीय, व प्रशासकीय क्षेत्रात योग्य प्रमाणात सहमागी करून निर्णय प्रक्रियेमध्ये शामील करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय.''

**व्याख्या :—**

''आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रांमध्ये कायदे व कल्याण कार्यक्रमांच्या माध्यामातून महिलांना पुरूषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे, स्त्री—पुरूष भेदभाव नष्ट करणे, विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे या प्रक्रियेला सक्षमीकरण असे म्हणतात''.

**जागतीक बँकेले केलेली व्याख्या :—**

''व्यक्तींना किंवा गंटाना आपली पसंती ठरविण्याची व ही पसंती इष्ट त्या कृती मध्ये आणि फलप्राप्तीमध्ये उतरविण्याची क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे सक्षमीकरण होय''.

I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 410-412
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

''महिला सक्षमीकरण म्हणजे आत्मविश्वासामध्ये वाढ क्षमता वृद्धी, सामाजिक जाणीव जागृती, कार्यात्मक साक्षरता लिंगसमभाव, आरोग्य विषयक जाणीव, स्वत: आत्मसन्मानाने जगने, आत्मनिर्भर व वित्तीय संस्थाबरोबर जोडणी घेणे त्यास महिला सक्षमीकरण म्हणतात.''

अशाप्रकारे महिला सक्षमीकरणाबाबत विविध संकल्पना आहेत.

**उद्देश :—**

- महिलांची उन्नती, विकास, शारिरीक, मानसिक आणि भावनिक जीवनाची गुणवत्ता सुधारणे.
- आरोग्य सेवा, दर्जेदार शिक्षण, रोजगार, समान मोबदला, आणि सामाजिक सुरक्षितता यासुविधांचा लाभ घेणे.
- राजकीय क्षेत्रातील दुर्गुणाचा नाश करण्याकरीता निकोप राजकीय क्षेत्रात प्रेवश करणे हा महिला सक्षमीकरणाचा उद्देश आहे.
- लिंगभेदावर आधारित भेदाभेद नष्ट करणे. ही महिला सक्षमीकरणाची प्रमुख उद्दीष्टये आहेत.

**गृहीतके:—**

• पुरूषांच्या बरोबरीने समान राजकीय, आर्थिक, सामाजिक अधिकार मिळण्यासाठी महिला सबलीकरण हा आंतरराष्ट्रीय पातळीवर चालविलेला संघर्ष आहे.

• पुरूषांच्या बरोबरीने महिलांना विकास आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणे हे या प्रक्रियेत अपेक्षित आहे.

• महिलांना आत्मसन्मान, आत्मविश्वास, हक्क, अधिकार, निर्णय, कर्तव्य, याची जाणीव व्हावी.

• संपूर्ण समाज सुखी समाधानी, आनंदाने व जबाबदार म्हणून कार्य करण्यास सबलिकरण गरजेचे आहे.

• समाजामध्ये मुलगी, पत्नी, माता, आदर्श स्त्री या भूमिका सक्षमरीत्या पार पाठण्याकरीता आवश्यक आहे.

• स्त्री शकतीचे संघटन होण्याकरिता आणि महिलांवरी, अत्याचार, अन्याय दूर करण्याकरिता महिलांचे सक्षमीकरण आवश्यक आहे.

**तथ्य संकलन :**

महिलांच्या अनेक समस्या आहेत आज ही समाजातील महिलांना दुय्यम स्थान दिले जाते ग्रामीण भागात तर त्याहीपेक्षा विपरीत स्थिती असलेली दिसून येते. भारताची अरधी जनसंख्या महिला आहे. स्त्रीयांची जर स्थिती अशीच राहिली तर देश प्रगत होऊ शकणार नाही यादृष्टीकोनातून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवर बरीच सकारात्मक पाऊल उचलण्यात आली.

महिलांच्या विविध प्रश्नांवर, समस्यांवर चर्चा करण्यासाठी सन १९७५ पासून आंतरराष्ट्रिय महिला परिष्दांचे आयोजन करण्यात येत आहे. महिलांच्या विविध प्रश्नांवर संशोधन करून शासनाला महिलांविषयी समस्यांची माहिती करून देण्यासाठी भारतामध्ये ३० ऑगस्ट १९९० साली राजकीय महिला आयोग आणि महाराष्ट्रामध्ये २५ जानेवारी १९९३ साली राज्य महिला आयोगाची निर्मिती करण्यात आली.

महिलांचा आर्थिक दर्जा व शैक्षणिक स्तर उच्चावण्यासाठी महाराष्ट्रामध्ये सन १९९४ व सन २००१ या कालावधीत महिलांना शासकीय नोकऱ्यांमध्ये आणि महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात व महाविद्याल्यांमध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

**सक्षमीकरणाचे घटक :**

शासनाच्या साथीने महिलांचे सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी शासनाने अनेक योजना राबविल्या आहेत. त्यात बचत गटाची योजना महिलांच्या सक्षमीकरणात आविष्कार ठरली आहे.

**बचत गटाव्दारे महिलांचे सक्षमीकरण :—**

बचत गटाची संकल्पना:— ''ज्यात प्रामुख्याने समान प्रश्न सारखे आचार विचार समाज मत आणि परस्पर जवळीक असणारे लोक स्त्री किंवा पुरूष एकत्र येतात व बचतीच्या माध्यमातून आपल्या छोटया मोठया आर्थिक गरजा भागवून आपला सर्वांगीण विकास करतात त्यास बचत गट म्हणतात.''

समाजातील विषमता कमी करण्यासाठी अनेक स्तरांवर चळवळी सुरू आहेत. महिलांचे सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी सिव्हिल सोसायटी, सिटीसन चटिर, स्वयंसेवी गट यांसारखे बचत गट आजच्या जागतिकरीकरणाच्या युगात खूप महत्तवाचे ठरते. आपल्या कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधाराण्यासाठी आणि मुलांना योग्य शिक्षण देण्यासाठी व महिलांचे सबलीकरण घडवून आणण्यासाठी बचत गटाचे विशेष महत्त्व आहे.

बचत गटाचा इतिहास अभ्यासतांना बांगलादेशाचा उल्लेख बचत गटाकरीता महत्त्वाचा ठरतो. बांगलादेशातील चितगाव विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक मोहम्मद युनूस हे त्याचे निर्माते मानले जाते. १९७६ मध्ये त्यांनी ग्रामीण बँक नावाचा कार्य संशोधन प्रकल्प सुरू केला १९८३ मध्ये सरकारने या प्रकल्पाला बँकेचा दर्जा दिला. हा स्वयंशाश्वत बचतीसाठी तयार केलेला गट आहे. भांडवल गुंतवणूकीसाठी बचत गट उपयुक्त ठरते. ही ग्रामीण बँक प्रामुख्याने महिलांना कर्ज देते. गेल्या १० ते

२० वर्षात बचत गटाव्दारे महिलांचे सबलीकरण विविध स्तरावर झालेले दिसून येते. बचत गटाव्दारे पुढीलप्रमाणे महिलांचे सक्षमीकरण होतांना दिसून येते.

**घ) आर्थिक सक्षमीकरण :**

स्त्री कामाचा दर्जा, कौशल्य, क्षमतांचा विकास करण्यासाठी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण घडवून आणणे ही काळाची गरज आहे. स्वतंत्र उदयोग सुरू करण्यासाठी जोखीम स्वीकारावी लागते. परंतु स्वयंसहाय्यता बचत गटामार्फत धाडसाने उदयोग सुरू करता येतात. कारण् उदयोग, प्रशिक्षण, भांडवल उभारणी, विक्री व्यवस्था, यंत्रसामग्री, कच्चामाल, कर्जफेड इ. करीता मार्गदर्शन या गटामार्फत दिली जाते. महाराष्ट्रात अन्नपूर्णा महिला मंडळ आणि तामिळनाडू वर्किंग व्युमन्स मंच, नॅशनल बॅंक फॉर अॅग्रिकल्चर अॅन्ड रूरल डेव्हलपमेंट व्दारे प्रायोजित गटांनी स्वयंरोजगार महिला संघटना, सेवाभावी गरीब स्वंयरोजगार महिला कामगार संघटना या संघटनांचे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणात महत्तवपूर्ण योगदान आहे.

**सामजिक सक्षमीकरण :–**

समाजातील चालीरिती, रूढी, परंपरा या बंधनामुळे स्त्रीचे सामाजिक खच्चीकरण, मोठ्य प्रमाणात होत असल्याने ती या बंधनाने अबला बनेलेली आहे. स्वातंर्त्यापूर्व आणि स्वातंर्त्यानंतर शिक्षणाच्या माध्यामातून सामाजिक सुधारणा घउवून आणून महिलांना समाजाच्या बंधनातून मुक्त केले. यात महत्त्वाचा घटक स्वयंसहाय्यता बचत गट होय. या गटामुळे महिला एकत्र येवू लागल्या स्त्री–पुरूष समानता समाजात निर्माण झाली महिलांनी स्वत:च्या हक्कासाइी या गटांमार्फत चळवळी उभारल्या. त्याचे परिणाम स्वरूप क्रेडिट व्यवस्थापन गट हे बचत गटांसारखेच असतात. म्हैसूर रिहॅबिलिटेशन डेव्हलपमेंट एजन्सीने विकसीत केलेल्या क्रेडि मॅनेजमेंट ग्रॅुपची प्रमुख वैशिष्टये म्हणजे आत्मीयता, स्वयंसेवा अभिसरण आणि १५ ते २० व्यक्तींचे समर्थन आणि त्यांचा मुख्य उद्देश महिलांमध्ये सामाजिक सक्षमीकरणाला चालना देणे हा आहे.

**राजकीय दृष्ट्य सक्षमीकरण :–**

स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून महिला राजकीय क्षेत्रात पूढे येत आहेत. बचत गटांच्या माध्यमातून संघटन, व्यवस्थापन निर्णय, नियंत्रण, राजकीय डावपेच, नवीन कौशल्य या गुणांचा विकास महिलांमध्ये होऊ लागला आहे. पंचायत राज संस्थांचा कारभार सुरळीतपणे पार पाडून नवीन नेतृत्व आणि कर्तृत्वाची उदाहरणे राजकीय क्षेत्रात महिलांच्या रूपाने उभी राहत आहे. स्वयंसहाय्यता बचत गटामुळे राजकीय दबाव गट निर्माण होत आहे. राजकीय व्यासपीठावर महिलांचा गौरव केला जात आहे.

अशा पद्धतीने बचत गटाव्दारे महिलांचे विवधि स्तरावर सक्षमीकरण होत आहे.

**शिफारशी :**

- महिला सक्षमीकरणाव्दावारे स्त्रि शिक्षणाच्या प्रमाणात वाढ करणे.
- महिलांना आर्थिक दृष्ट्य स्वावलंबी बनविने.
- आर्थिक व्यवहार व संपत्तीमध्ये महिलांना अधिकार देणे.
- राजकारणात महिलांना योग्य प्रतिनिधित्व देणे.
- सार्वजानिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये महिलांना सहभागी करून घेणे.
- महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे.
- पुरूषांच्या मानसिकतेत बदल करून स्त्री–पुरूष समानतेचे तत्त्व विकसीत करणे.
- विकास योजनां व कार्यक्रमांमध्ये महिलांना प्रोत्साहन व प्राधान्य देणे.

**निष्कर्ष :–**

स्त्रीयांमध्ये जन्मताच काही अशा क्षमता असतात. त्यांच्या विकासाने महिला अनेक अठचणीवर मात करून घराची कौटुंबिक जबाबदारी अगदी सक्षमतेने सांभाळली आहे. प्रामुख्याने महिलांमध्ये कठोर परिश्रम करण्याची क्षमता असते उत्तम प्रकारे नियोजन कौशल्य असते. महिलांचा स्वभाव मुळातच काटकसरीचा असून पैशाची बचत करण्याकडे तीचा कल असतो. महिलामध्ये जिद्द आणि चिकाटी हा गुण असतो. महिलांचा सर्वांगीण विकास, स्थानिक लोकांचा सहभाग, विकासाचे नियोजन, अंमलबजावणी आणि मुल्यमापना पर्यंत स्वयंसहाय्यता बचत गट महिलांकरीता सक्रिय झाले आहेत. महिलांना मिळणाऱ्या संधी व येणाऱ्या अडचणींवर मात करून महिलांना विविध स्तरावर आपले कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी देऊन त्यांना सक्षम बनविणारे केंद्र म्हणून स्वयंसहाय्यता समूहाची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

**संदर्भ :**

महाराष्ट्र उद्योजक्ता विकास केंद्राचे प्रकाशन मासिक दृ उद्योजक २०१९

महिला सशक्तिकरण एवं राजकीय योजनाएँ– डॉ सुनंदा भंडारी

बचतनामा दृप्रा. विजय कुलकर्णी

सहयोगिनी, स्वयंसहाय्यता बचत गट चळवळीचा कणा– कुसुम बाळसराफ

अल्पबचत नियोजन (बचत गट) डॉ.एम. मु. मुलाणी

आधुनिक गृह व्यवस्थापन आणि गृह सजावट– डॉ. विद्या कोल्हटकर